International Research Journal of Humanities, Language and Literature
ISSN: (2394-1642)
Impact Factor 8.972 Volume 11, Issue 6, June 2024
Association of Academic Researchers and Faculties (AARF)
Website-www.aarf.asia, Email : editor@aarf.asia , editoraarf@gmail.com

# पावरा समाजाची आर्थिक स्थिती: शैक्षणिक आणि सामाजिक संदर्भ

**अनिल हिरामण जाधव** संशोधक विद्यार्थी ,
**डॉ,सुचेता ज्योतीनाथ संकपाळ .** संशोधन मार्गदर्शकअ ,सहयोगी प्राध्यापक ,ॅडविठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र .
नाशिक ,महाविद्यालय

**सारांश**

कोणतीही व्यक्ती अथवा समाज समूहाचा आर्थिक विकास हा इतर अनेक मानवी जीवनाशी संबधित गोष्टींवर अवलंबून असतो. विशेष करून आदिवासी समाज हा पूर्वीपासूनच इतर समाज घटकांपासून वेगळा राहत आला आहे. वस्ती, वाडे, पाडे, जंगली भूभाग, माळरान, शेती इत्यादी आदिवासी समाजाची मुख्य निवासस्थाने राहिली आहेत. अशात त्यांचा आर्थिक विकास होणे सर्वार्थाने शक्य नाही. शासनाने त्यांच्यासाठी अनके योजना राबविल्या आहेत. मात्र त्या योजना प्रत्यक्षात कमी आणि कागदावरच जास्त दिसून येतात. विशेषकरून पावरा हा आदिवासी समाज महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आहे. आजही आर्थिक दृष्ट्या हा समाज मागासलेला दिसून येतो. योग्य सामाजीकरण न होणे, मर्यादित उत्पन्नाची साधने, व्यवसायाचे अपूर्ण ज्ञान, प्रबोधनाची कमी, प्रशिक्षण नसणे, योजनांची योग्य कार्यवाही न होणे अशी विविध करणे असली तरी मुख्य कारण हे शिक्षण नसणे हेच दिसून येते. आज आश्रमशाळा, मोफत जेवण व अभ्यास साहित्य पुरविणे तसेच विविध सुविधा दिल्या जात असल्या तरी या समाजातील साक्षरतेचे प्रमाण कमीच आहे. आजही हा समाज इतर परिसराशी जुळवून घेण्यास तेवढा उत्सुक दिसून येत नाही. शिक्षणाचे महत्व पटल्यास नक्कीच या समाजाचा विकास होण्यास मदत होणार आहे. वर्तमान स्थितीत हा समाज बऱ्यापैकी शिक्षण प्रवाहात आला असला तरी त्याचे फलित दिसून येत नाही आहे. अर्थातच आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे हा समाज आपली मुलांना शिक्षण न देता कामावर पाठवण्यास आग्रही असतो. हळू-हळू या समाजाला शिक्षणाचे महत्व पटू लागले आहे ही एक सकारात्मक बाजू आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्यास या समाजाचा आर्थिक विकास होण्यासही मदत होईल.

**मुख्य संबोध :** पावरा समाज, आर्थिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, साक्षरतेचे प्रमाण, निरक्षरतेची करणे

## प्रास्ताविक

पावरा समाज हा प्राचीन काळापासून जंगलातच वास करीत आला आहेत्यामुळे ते आर्थिक दृ .ष्ट्या संपन्न होऊन विशेष काहीतरी करावे अथवा श्रीमंत होऊन जीवन जगावे असा त्यांचा विचार कधीच नव्हता . आधूनिक ज्ञान व तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे तसेच शिक्षणापासून वंचित असल्यामुळे आर्थिक संपन्नता ही .संकल्पना त्यांना कधी मानवलेली दिसत नाहीपावरा समाजाचा आर्थिक दृष्टिने विचार करतांना इतिहासात डोकावल्यास असे दिसते की, दिवसभर श्रम करून जंगलाचा आधार घेऊन जंगली फळे व कंदमुळे खाऊन, गवत विकून, थोडयाफार प्रमाणात शेती करून, जनावरे पाळून, शेतमजूरी करून, श्रीमंतांच्या घरात धुणी भांडी, बागकाम, रखवालदार म्हणून काम करून, शेतात जागल्या म्हणून काम करून ते आपल्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करीत असत.याशिवाय त्यांना दूसरा पर्याय नव्हता .

© Association of Academic Researchers and Faculties (AARF)
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

काही प्रामणात अपवाद सोडले तर स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतरही पावरा समाज आर्थिक दृष्टया मागास दिसून येतोआजही हा समाज जास्त करून .त्यांच्या आर्थिक परिस्थितीत विशेष फरक पडलेला दिसून येत नाही . डोंगरमाथ्याच्या पायथ्याशी छोटया .पारंपारिक शेती करतांना दिसतो-छोटया पाड्यांवर राहतांना दिसतो . अंधश्रध्देत खितपत पडलेला दिसतोजंगलातील गवत व लाकडे विकून .मोलमजूरी करून पोट भरतांना दिसतो . .आर्थिक विनिमय जेमतेम करतांना दिसतोपावरा समाजाची लहान-लहान मुले शाळेत न जाता विविध ठिकाणी कामे करतांना दिसून येतातशेती बरोबर शेळी पालन ., गोपालन, वराहपालन, कोंबडी पालन इजोडधं .द्यांचा आधार घेऊन उपजिवीका पूर्ण करण्याचा प्रयत्न दिसून येतोअर्थात यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे या . यामुळे हा समाज पूर्वीही दारिद्र्यातच .समाजात प्राचीन काळापासून संचयवृत्ती नाही तसेच शिक्षणही नाही .होता व आजही आर्थिक दृष्टया मागासलेलाच दिसून येतो

भारतातील बऱ्याच आदिवासी भागापर्यंत अजूनही शिक्षण पोहचलेले दिसत नाहीतर जेथे वस्तीशाळा . आशेचा किरण .व इतर माध्यमांनी शिक्षण पोचले आहे तेथे शिक्षणाचे महत्व व जाणीव पोचलेली दिसत नाही म्हणजे गेल्या10 ते 15 वर्षात आदिवासीतील अनेक जमाती स्थिर होतांना दिसत आहेशिक् .षणाच्या प्रभावामुळे आपल्या मुलांनी शिकावे या भावनेपोटी आदिवासी जमातीतील अनेक पालकांच्या दृष्टिकोनाचा विकास होतांना दिसत आहेमात्र आदिवासीतील पावरा जमातीतील लोक आजही शेतमजूरी व जंगल संपत्तीवर . त्यामुळे ते जंगलातच वस्ती करू .आपला उदरनिर्वाह चालवितांना दिसतातन राहणे अथवा गावाच्या विशिष्ट कोपऱ्यात स्वतंत्र वस्ती करून राहणे अधिक पसंत करतात .

पावरा समाज आपल्या मुलांना शाळेत पाठवित नाही आणि पाठविले तर अचानक केव्हाही मधूनच शाळेतून मुलांना उठवून घेतातशिक्षणाचा स्विकार करण्याच्या .शिक्षणाचे महत्व त्यांना कळत नाही . तयारीत ते दिसून येत नाहीमुलांना शिकायला पाठविल्यास कुटूंबाचे आर्थिक उत्पन्न कमी होईल तसेच मुलगा निष्क्रिय . काही प्रमाणात या विविध प्रकारच्या अज्ञानामुळेही ते शिक्षणापासून वंचित .होईल अशी त्यांना भिती वाटते म्हणूनच आजही पावरा जमात ही आर् .राहिलेले दिसतातथिकव शैक्षणिक दृष्टयामागासलेली दिसून येते .

**संशोधन समस्या**

शिरपूर तालुक्यातील पावरा समाजाची आर्थिक स्थिती: शैक्षणिक आणि सामाजिक संदर्भ

**संशोधनाची उद्दीष्ट्ये**

1.शिरपूर तालुक्यातील पावरा समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

2.शिरपूर तालुक्यातील पावरा समाजाच्या आर्थिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

3.पावरा समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाचे महत्व**

1.प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातीलप्रमुख आदिवासी जमातीतील एक पावरा जमातीवर आहे.

2.प्रस्तुत संशोधन हे पावरा जमातीचे शैक्षणिक संशोधन आहे या संशोधनातून पावरा जमातीची .आर्थिक स्थिती समजल्यामुळे त्या स्थितीला कारणीभूत असल्येल्या बाबींचा उलगडा झाल्याने संशोधकाला काही उपाय योजना सुचविता आल्या आहेत.

3.पावरा जमातीच्या आर्थिक व शैक्षणिक विकासाचा संशोधनात्मक अभ्यास सदर संशोधनातून झाला आहे .

4.पावरा समाजाला शिक्षण मिळाल्यास या समाजाच्या आर्थिक स्थितीत बदल होण्यास मोठ्या प्रमाणावर मदत होऊ शकते हे या संशोधनावरून लक्षात येते .त्यादृष्टीने या समाजात शिक्षणाचा अधिकाधिक प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे .

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

1.सदरसंशोधन हेशिरपूर तालुक्यातील पावरा समाजाच्या आर्थिक स्थितीचा त्यांच्यासामाजिक आणि शैक्षणिक स्थितीशी संबंध अभ्यास करणारे आहे .

2. प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी शिरपूर तालुक्यातील पावरा समाजाचे 100 विद्यार्थी, 100 शिक्षक तसेच 50पावरा जमातीच्या पालकांचा विचार केला गेला आहे.

3. सदर संशोधनाची व्याप्ती ही शिरपूर तालुक्या पावरा समाजापूरतीच मर्यादित आहे .
4. संशोधकाने शिक्षक, विद्यार्थी यांच्याकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीतील सर्वच माहिती व मुलाखतीद्वारे प्राप्त झालेली माहिती यांनाच सत्य मानून निष्कर्ष काढलेले आहेत.

**संशोधन पध्दती**

संशोधकाने संशोधनासाठी निवडलेली समस्या वर्तमानकालिन व सामाजिक विषयाशी निगडीत असल्याकारणाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे.

**नमुना निवड**

संशोधकाने शिरपूर तालुक्यातील पावरा जमातीचा अभ्यास करण्यासाठी 100 शिक्षक, 100 पावरा समाजाचे विद्यार्थी निवड नमुना म्हणून केली आहे तसेच पावरा समाजाच्या .50 पालकांची मुलाखतीसाठी नमुना म्हणून निवड केलेली आहे.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्रामुख्याने वापरले गेलेले साधन म्हणजे प्रश्नावली होयप्रश्नावलींचे विभाजन . .खालीलप्रमाणे करण्यात आले आहे

१)शिक्षकांसाठी प्रश्नावली २) विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली

याचबरोबर पावरा समाजातील पालकांकडून माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत तंत्र संशोधकाने पवापरले आहे .

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनांच्या आधारे माहिती संकलित करण्यात अलेली आहेसदर माहिती मुख्याध् .यापक, शिक्षक व पावरा समाजाचे विद्यार्थी यांचेकडून प्रश्नावलीच्या आधारे संकलित करण्यात आली आहेतसेच पावरा पालकांकडून मुलाखतीच्या आधारे माहिती संकलित करण्यात आली . सदर संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन शेकडेवारी तसेच वर्णणात्मक विश्लेषण या आधारे केल .आहेे आहेयात प्रथम मुख्याध्यापक .तसेच आवश्यक तेथे कोष्टके व आलेखांचा उपयोग करण्यात आलेला आहे . प्रश्नावली, शिक्षक प्रश्नावली, विद्यार्थी प्रश्नावली व शेवटी मुलाखत अशा क्रमाने विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले आहे .

**संशोधनाचे निष्कर्ष**

1. पावरा समाज हा शेतीवर अवलंबून असणारा शेतीप्रधान समाज आहे .या समाजाद्वारे आपला संपूर्ण उदरनिर्वाह शेतीवरच करण्याचा प्रयत्न केला जातो .व्यवसाय व नोकरी करणारे लोक खूपच कमी दिसून येतात. एकंदरीत पारंपारीक शेती व्यवसाय व शेतमजूरी हेच या समाजाचे अर्थोत्पादनाचे प्रमूख साधन दिसूनयेतेअशा . .स्थितीत हा समाज शिक्षणाकडे आशादायी दृष्टीने पाहतो आहे
2. पावरा समाजात सण, उत्सव, यात्रा, धार्मिक विधी यांना विशेष महत्व दिसून येतेया घटकांचा खूप मोठा . .परिणाम या समाजावर झालेला दिसतो पावरा समाजात अशा वेळी पैसा नसला तरी खुल्या हाताने खर्च करण्याचा प्रयत्न केला जातोशिल्लक टाकणे ही संकल्पना फारशी नसल्यामुळे त्या .-त्यावेळी पैसा उभे करणे गरजेचे भासते व त्यासाठी एकमेव मार्ग शिल्लक राहतो तो म्हणजे कर्जाने पैसा उभा करणेअसे धार्मिक सण ., धार्मिक विधी, यात्रा, रीतीरिवाज-, उत्सव, इत्यादीसाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठीच अनेकांच्या शिक्षणाचा बळी जात असावा .
3. पावरा समाज हा अत्यंत धार्मिक व दैवावर विश्वास ठेवणारा आहेसामाजिक दृष्टीकोनातून सर्व कूटूंब देव .-देवतांच्या यात्रा काळात, उत्सव काळात घरातील सर्व सदस्य पूर्ण वेळ सहभागी होतातघरातील मूलांनाही . घरीच ठेवले जाते. यामुळे त्या मुलांचे शैक्षणिक नुकसान तर होतेच पण त्याबरोबर त्या काळात घराचे अर्थोत्पादनही थांबते, खर्च मात्र होत राहतोअर्थातच या सामाजिक भावनेचा परिणाम पावरा समाजाच्या . .आर्थिक व शैक्षणिक स्थितीवर होत असतो

4. केवळ सण, उत्सव, यात्र हेच नाहीत तर पावरा समाजात जन्मापासून तर मृत्यूपर्यंत व मृत्यूनंतरही अनेक विधी केले जातातपरंपरा-म्हणजेच सामाजिक रुढी ., प्रथा, धार्मिक विधी, पूजा .अर्चा आले की आपोआप खर्च हा येतोच- एकंदरीत आर्थिक स्थितींचाताण अशा वेळी या समाजावर पडतो.

5. पावरा समाजात आश्रमशाळा हया अधिकाधिक लोकप्रिय आहेतकारण या समाजातील बहुतांश पालक . असे असले तरी मुलांना आश्रमशाळेत .आपल्या मुलांना आश्रमशाळेत शिकविण्यासाठी पाठवितात पाठविण्यामागे आर्थिक दृष्टीकोनच अधिक दिसून येतोकारण एकंदर घराचे दारि .द्यामुळे शिक्षणासाठी पैसा उपलब्ध नसतो. अर्थातच आश्रमशाळेत सर्व मोफत मिळत असल्याने ते मुलांना शाळेत टाकतात .तेथे मुलांची राहण्याची व खाण्याची व सोबत शिक्षणाची मोफत सोय होते.

6. घरातील कूटूंब प्रमुखाबरोबरच पावरा समाजात घरातील महिलांनाही पत्नी), आई, बहिण, मुली ( घरकामाबरोबर शेतीची सर्व कामे करावी लागतात असे दिस्ून येतेम्हणजेच मूलींच्या शिक्षणाला महत्व न . यावरुन दिसून येते की .देता आर्थिक उत्पन्नाला अधिक महत्व दिले जाते हे यावरुन स्पष्ट होते, आजही या समाजात मूलींच्या शिक्षणाविषयी जागृकता दिसून येत नाहीकदाचित आर्थिक दारिद्रयामूळे असे होत असेल .. मात्र याचा परीणाम मूलींच्या शिक्षणावर मोठया प्रमाणावर होतो व तो प्रतिकूल परिणाम होतो ही चिंताजनक बाब आहे .

7. पावरा पालकांना शिक्षण आणि सामाजिक व आर्थिक स्थिती यांचा घनिष्ठ संबंध आहे हे जाणवल्याचे दिसते . कारण त्यांच्या मते, शिक्षण घेतल्यास चांगली नोकरी मिळते, आर्थिक उत्पन्न हे नियमित व जास्त असते, समाजात शिकल्यामुळे लोक मान देतात, समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते, शिकल्यामुळे घरातील इतर सदस्यही प्रगती करण्यासाठी प्रयत्नरत होतात.

8. शेती करण्यासाठी शिक्षणाची गरज नसते अशी धारणा पावरा समाजाची असल्यामुळे शिक्षण घेणे ते फक्त व्यापार अथवा जास्त करुन नोकरीसाठीच असे समीकरण झालेले दिसते नोकरीतून नियमित .पैसा मिळेल तसेच नोकरीमुळे सामाजिक दर्जाही उंचावेल याची कल्पना या समाजाला झालेली दिसते.

9. आदिवासी समाज पुर्वीपासून जंगलात वास्तव्य करत आला आहेशहरीकरण व या सामाजिकरण होण्याची . प्रक्रियासुरु असली तरी आजही बहुसंख्य आदिवासी समाज पाडे व वाडे करुन जंगलात वास्तव्य करतांना दिसतो . अर्थातच, यामुळे आदिवासी समाज आजही गरीबीच्या गर्त्यातून बाहेर पडतांना दिसत नाही .

10. शिक्षणाचा आर्थिक स्थितीवर प्रभाव पडतो याची जाणीव पावरा समाजाला झालेली दिसते कारण 93% प्रतिसादक विद्यार्थ्यांना शिक्षणामुळे आर्थिक स्थिती सुधारेल असे वाटते तर .7% प्रतिसादक विद्यार्थ्यांना तसे वाटत नाही कदाचित शिक्षणाच्या फायद्यांची जाणीवच या.7% प्रतिसादकांना झालेली नसेल असे म्हणता येईल.

11. पावरा समाजाच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न पाहिले असता असे दिसून येते की, 62%कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न हे 10,000/- ते 30,000/-रुपयांच्या दरम्यान आहे तर उरलेल्या 38% कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न हे 30,000/-ते 60,000/- रुपयांच्या दरम्यान आहेयाचाच अर्थ निम्म्यापेक्षा अधिक कूटूंबाचे आर्थिक उत्पन्न हे आ .जच्या महागाईच्या दृष्टीने अत्यंत कमी आहे .

12. आर्थिक स्थितीचे प्रतिबिंब दाखविणारी एक महत्वाची बाब म्हणजे स्वताच्या मालकीचे घर असणे . प्रतिसादकांमध्ये81% प्रतिसादक पालकांची घरे स्वताची आहेत तर 19% पालकांची घरे स्वताची नाहीत अर्थात ते तेथे भाडे तत्वावर राहतातभाडयाच्या घरात राहतात ते घरातील मूलांच्या :म्हणजेच जी कूटूंबे स्वत . .शिक्षणासाठी खर्च करण्यास कितपत तयार होत असतील हा एक प्रश्नच आहेअर्थातच ज्यांची स्वताची घरे आहेत ती एकतर मातीची कच्ची घरे आहेत किंवा झोपडीवजा घरे आहेत. पक्की घरे असणाऱ्यांचे प्रमाण खूपच कमी आहे.

13. शिरपूर तालुक्यातील पावरा समाजाचा मुख्य आर्थिक स्त्रोत हा शेती व्यवसायच दिसून येतोअर्थातच . .ज्यांची स्वताच्या मालकीची शेती आहे त्यांचे ठिक पण ज्यांच्याकडे शेती नाही ते शेतमजूरीच करतांना दिसतात

14. खर्चाची तोंड मिळवणी करता यावी म्हणून जोडधंदा असल्याने दिवसातला मोठा वेळ या जोडधंद्यात जात असणारआपोआपच . त्यामुळे घरातील मूलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष होते.

15. पावरा समाजातील पालकांना स्वताच्या आर्थिक मागासलेपणाला शिक्षणाचा अभाव असणेच जबाबदार वाटते असे त्यांच्या प्रतिसादावरुन दिसून येते कारण.92% प्रतिसादक पालकांनी स्वताच्या आर्थिक स्थितीला जबाबदार शिक्षणाच्या अभावाला मानले आहेपावरा पालकांच्या या मतांवरुन या समाजाचे भविष्य चांगले व . आशादायी दिसून येते, कारण या समाजाला जाणीव तरी होत आहे की शिक्षण घेतल्याने आपली आर्थिक परिस्थिती सुधारेल व आपण शिकलो नाही म्हणून आजही दारिद्र्यातच जीवन जगत आहोत.

**शिफारशी**

1. शिक्षणात उद्योगाची व व्यवसायाची नवनवीन क्षेत्रे आदिवासींच्या ओळखीची व्हावीतसंगणक .उदा ., औषधशास्त्र, वास्तूशास्त्र, मोबाईल, बांधकाम, व्यापार, आधुनिक शेती, तंत्रज्ञानइ यामुळे अशाही क्षेत्रात . आदिवासी विद्यार्थी निश्चितच चमकतील.

2. व्यवसाय शिक्षणात विद्यार्थी ज्या भौगोलिक परिसरात राहतो त्या परीसराशी संबंधित जोडधंदे किंवा व्यवसाय यांचे प्रशिक्षण दयावेदुग्ध व्यवसाय .उदा., कुकूट पालन, वराह पालन, ससे पालन, इमू पालन, शेळीमेंढी - .पालन इ

3. आदिवासींच्या आर्थिक दुर्बलतेचे महत्वाचे कारण व्यसनाधिनता दिसून येतेत्यांची व्यसनापासून मुक्तता . करण्यासाठी विविध कार्यक्रम मोठया प्रमाणावर राबविणे गरजेचे आहे .

4. व्यसनाधीनतेचे प्रमुख कारण त्यांच्या दूर्बल आर्थिक स्थितीत असते तेव्हा आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी काही ठोस आर्थिक कार्यक्रम आखणे गरजेचे आहे .

**संदर्भ सूची**


1. आगलावे डॉप्रदिप .,) 2000),संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र, नागपूर, विद्या प्रकाशन
2. उमाठे वि.श .व मुळे रा .तु .,) 1987),शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, पुणे, नुतन प्रकाशन
3. कऱ्हाडे डॉ. बी.एम .,) 2004),शास्त्रीय संशोधन पध्दती, नागपूर, पिंपळापूरे प्रकाशन
4. गारे गोविंद, (1994), आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन, नागपूर, अमृत प्रकाशन
5. गारे गोविंद, (2002), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन
6. घोरमोडे डॉ. केकला .व घोरमोडे डॉ .यु .,) 2005),शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर, विद्या प्रकाशन
7. लोटे रा. ज., (2006), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन
8. पिचड डॉनलिनी .,) 1999),आदिवासींचे शिक्षण, नाशिक, जयदिप प्रकाशन
9. www.tribal.nic.in
10. www.trti.mah.nic.in